# २. विविध व्यवसाय संघटन प्रकारांचा तुलनात्मक अभ्यास
## (Comparative Study of Various Forms of Business Organisations)


| | | | |
|---|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | २.४ | संयुक्त भांडवली संस्था |
| २.२ | व्यक्तिगत व्यापारी संस्था | २.४.१ | अर्थ व व्याख्या |
| २.२.१ | अर्थ व व्याख्या | २.४.२ | वैशिष्ट्ये |
| २.२.२ | वैशिष्ट्ये | २.५ | विविध व्यावसायिक संघटनांचा तुलनात्मक अभ्यास |
| २.३ | भागीदारी संस्था | २.६ | सारांश |
| २.३.१ | अर्थ व व्याख्या | २.७ | महत्त्वाच्या संज्ञा |
| २.३.२ | वैशिष्ट्ये | २.८ | स्वाध्याय |


### २.१ प्रस्तावना (Introduction) :

व्यापार आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये आपणास विविध व्यावसायिक संघटना प्रकार कार्य करीत असतांना आढळतात. व्यापारी संघटना लहान, मध्यम आणि मोठ्या स्वरूपात कार्य करीत असतात. उद्योग, व्यवसाय आणि व्यापाराच्या विकासाच्या कार्यात उत्पादन, निर्मिती, खरेदी-विक्री आणि ग्राहक या सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य संघटना करीत असतात.

व्यवसाय संघटना कोणत्याही प्रकारची असली तरी समाजाला वस्तू व सेवांचा पुरवठा करणे हा त्यांच्या कार्यामागील मुख्य हेतू असतो.

व्यापारी संघटना म्हणजे अशी रचना की, जी औद्योगिक किंवा व्यापारी कार्य करील आणि वस्तूंचे उत्पादन व पुरवठा यांच्या माध्यमातून फायदा मिळवेल.

व्यवसाय क्षेत्रात कार्य करीत असलेल्या या विविध व्यावसायिक संघटना एकदम निर्माण झाल्या नाहीत तर व्यापाराच्या विकासाच्या अवस्थांतून एकापाठोपाठ एक अशी त्यांची गरजेनुसार निर्मिती झाली.

सुरुवातीस '**एकल व्यापारी**' संस्था निर्माण झाल्या, व्यवसाय वाढविण्यासाठी आणि भांडवल व व्यवस्थापकीय कौशल्ये या गरजा भागवण्यासाठी सामूहिक मालकी असणाऱ्या '**भागीदारी संस्था**' अस्तित्वात आल्या. मोठ्या प्रमाणावर भांडवल उभे करून,व्यवसायामध्ये आधुनिक तंत्र व कौशल्याचा वापर करून,उत्पादन आणि सेवा कार्यामध्ये नफा मिळविण्यासाठी '**संयुक्त भांडवली संस्था**'**(कंपनी)** या व्यवसाय संघटनेचा उदय झाला.

समाजाला मूलभूत स्वरूपाच्या सेवा देण्यासाठी सहकारी तत्वावर कार्य करणाऱ्या '**सहकारी संस्थांचा**' उगम झाला.

आपण या प्रकरणात विविध व्यवसाय संघटन प्रकाराची माहिती व वैशिष्ट्ये आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणार आहोत.

### ❖ व्यवसाय संघटनांचे विविध प्रकार

विविध व्यवसाय संघटनांचे प्रकार पुढील प्रमाणे

- एकल व्यापारी / व्यक्तिगत व्यापारी संस्था
- भागीदारी संस्था
- संयुक्त भांडवली संस्था
- सहकारी संस्था

## २.२ एकल व्यापारी / व्यक्तिगत व्यापारी संस्था (Sole Trading Concern) :

### २.२.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition ) :

- अर्थ (Meaning)

जेंव्हा एखादी व्यक्ति स्वत:चे भांडवल व्यवसायात गुंतविते व व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन आणि नियंत्रण स्वत: करते, झालेल्या नफ्या-तोट्यास स्वत: जबाबदार असते, तेंव्हा त्यास 'व्यक्तिगत व्यापारी / एकल व्यापारी' असे म्हणतात. व्यवसायातील धोके स्वीकारून नफा मिळविते,कोणत्याही कायदेशीर बाबींची पूर्तता न करता व्यक्ति ताबडतोब व्यवसाय सुरू करू शकते.मात्र व्यवसाय सुरू करण्यासाठी स्थानिक परवान्याची गरज असते.




एकल व्यापारी

- व्याख्या (Definition) :

➢ **"जेंव्हा एखादी व्यक्ति व्यवसायात स्वत:चे भांडवल गुंतविते व व्यवसाय स्वत:च्या जबाबदारीवर चालविते, व्यवसायातील नफ्या-तोटयाला स्वत:च जबाबदार राहते तेंव्हा त्यास 'एकल व्यापारी' किंवा 'व्यक्तिगत व्यापारी' असे म्हणतात". – जेम्स लुंडी**

➢ **"व्यापारात एकच व्यक्ति व्यवसायाला भांडवल पुरवठा करून,व्यवसायाचे व्यवस्थापन व नियंत्रण करते, आणि नफा-नुकसानीस स्वत: जबाबदार असते त्यास 'एकल किंवा व्यक्तिगत' व्यापारी असे म्हणतात." – डॉ. जॉन शुबीन**

### २.२.२ व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Sole Trading Concern) :




१) **सुलभ स्थापना (Easy Formation) :** व्यक्तिगत व्यापारी संस्थेसाठी कोणताही स्वतंत्र कायदा केलेला नाही. त्यामुळे हा व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागत नाही.देशातील सर्वसाधारण कायद्याचे पालन करून स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थेचा परवाना प्राप्त करून व्यक्ति या व्यवसायाची सुरुवात करू शकते.

२) **व्यवसायाची मालकी (Ownership of Business) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये एकच व्यक्ति व्यवसायाची मालक असते. व्यवसायाचा स्वामी या नात्याने व्यवसायातील सर्व मालमत्ता व साधनांचा तो एकटाच मालक असतो.

३) **स्वत:चे भांडवल (Own Capital) :** व्यवसायासाठी लागणारे भांडवल हे व्यक्तिगत व्यापाऱ्याला एकट्यालाच उभारावे लागते. नातेवाईक, मित्र यांच्याकडून मदत किंवा बँकेकडून कर्ज काढून व्यवसायासाठी स्वत:च भांडवल उभे करतो.

४) **व्यवस्थापन (Management) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये एकच व्यक्ति व्यवसायाची मालक असल्यामुळे व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रण त्यालाच करावे लागते. व्यवसायातील सर्व निर्णय तिच व्यक्ति घेते. एकल व्यापारी हा व्यवसायाचा एकटाच मालक व व्यवस्थापक असल्याने व्यक्तिगत व्यापार हा एकपात्री प्रयोगासारखाच असतो.

५) **अमर्यादित जबाबदारी (Unlimited Liability) :** व्यक्तिगत व्यापाऱ्याची व्यवसायातील जबाबदारी अमर्यादित असते. व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा झाला तर तो भरून काढण्यासाठी, देणी देण्यासाठी त्याची खाजगी मालमत्ता विकून देणी द्यावी लागतात.

६) **व्यवसायातील गुप्तता (Business Secrecy) :** व्यवसायामध्ये गुप्ततेला अतिशय महत्त्व असते. व्यक्तिगत व्यवसायातील सर्व महत्त्वाच्या गुप्त गोष्टींची माहिती फक्त एकाच व्यक्तिला असते. व्यावसायिक निर्णय, तंत्र, खरेदी-विक्री, नफा-तोटा इत्यादी बाबतीत कमाल गोपनियता ठेवता येते.

७) **नफा-तोट्यात भागीदार नसतो (No Sharing of Porfit-Loss) :** एकल व्यवसायामध्ये एकटाच मालक असल्याने सर्व नफा व्यक्तिगत व्यापाऱ्याला मिळतो. व्यवसायातील तोटाही त्यालाच सहन करावा लागतो. व्यवसायाच्या नफ्यात किंवा तोटयात इतर व्यक्ति भागीदार नसतात.

८) **ग्राहकांशी सलोख्याचे संबंध (Cordial Relations with Customers) :** व्यक्तिगत व्यापारामध्ये दैनंदिन जीवनात अनेक ग्राहकांशी त्याचे दररोज प्रत्यक्ष संबंध येतात . ग्राहकांच्या आवडी-निवडी, सवयी, चालीरिती आर्थिक परिस्थितीची त्याला माहिती असते . ग्राहकांशी सलोख्याचे व व्यक्तिगत संबंध निर्माण करून त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करतो.

९) **त्वरीत निर्णय (Promt Decision) :** व्यक्तिगत व्यापारी व्यवसायात एकच व्यक्ति मालक असल्यामुळे बाजारातील बदलत्या परिस्थितीनुसार, ग्राहकांच्या मागणीनुसार व आवडी निवडीनुसार वस्तूंच्या किंमतीवर ग्राहकांना दिली जाणारी सूट, हंगामानुसार (सणवार) उधारीची सवलत इत्यादी बाबत तो ताबडतोब निर्णय घेतो .

१०) **स्वयंरोजगाराचा मार्ग (Self Employment Source) :** विद्यमान काळात बेरोजगारी वाढत आहे . स्वयंरोजगाराचा मार्ग म्हणून व्यक्तिगत व्यापारी व्यवसाय लोकप्रिय होत आहे. काही व्यवसाय असे असतात की, ज्यामध्ये व्यक्तिगत कलागुणांना आणि कौशल्यास महत्त्व असते. असे व्यवसाय व्यक्तिगत व्यापारी स्वत: लक्ष घालून सुरू करतो व सेवा देतो.



कृती-

१) **'एकल व्यापारी संस्था प्रकार हा एकपात्री प्रयोगासारखा असतो' चर्चा करा.**

## २.३ भागीदारी संस्था (Partnership Firm ) :



भागीदारी संस्था

### २.३.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition )

- **अर्थ (Meaning)**


व्यक्तिगत व्यापारी व्यवसायातील सर्व व्यावसायिक कार्ये एकच व्यक्ति स्वत: हाताळू शकत नाही, कारण त्याच्याकडे भांडवल आणि व्यवस्थापकीय कौशल्ये ही मर्यादित असतात. व्यक्तिगत व्यापारातील दोष दूर करून व्यक्तिगत व्यापार विकसित करण्यासाठी व्यवसाय संघटनेचे नवीन स्वरूप उदयास आले. व्यवसायाचे विस्तारीकरण करण्यासाठी अधिक प्रमाणात भांडवल व व्यवस्थापकीय कौशल्य गरजेचे असते. म्हणूनच दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्ति एकत्र येऊन भागीदारी संस्थेची स्थापना करतात.

- **व्याख्या (Definition)**

➢ **"सर्वांनी किंवा सर्वांतर्फे एकाने चालविलेल्या व्यवसायातील नफ्याची वाटणी आपापसात करण्याचे ज्या व्यक्तिंनी मान्य केले आहे त्या व्यक्तिंच्या परस्परांतील संबंधाला 'भागीदारी' असे म्हणतात".– भारतीय भागीदारी कायदा १९३२.**

➢ **"दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्ति तोंडी किंवा लेखी करार करून व्यवसाय चालविण्याची सामूहिक जबाबदारी भागीदारी संस्था स्थापन करून घेतात". – डॉ. जे. ए. सुबिन**

### ३.३.२ भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Partnership Firm)




१) **करार (Agreement) :** भागीदारीची निर्मिती ही भागीदारीच्या करारातून होते. 'भागीदारीचा करार' हा भागीदारी व्यवसाय संघटनेचा पाया असतो. भागीदारीच्या अंतर्गत व्यवस्थापनासाठी एकमेकांमध्ये करार करणे आवश्यक

असते. या करारात भागीदारांमधील व्यवसायाच्या अटी व नियमांचा उल्लेख असतो. हा करार लेखी किंवा तोंडी असू शकतो. भविष्यकालीन मतभेद/विवाद टाळण्यासाठी भागीदारीचा करार लेखी स्वरूपात असणे गरजेचे असते. लिखित करारामुळे प्रत्येक भागीदाराचे हक्क, कर्तव्य व जबाबदाऱ्या अधिक स्पष्ट होतात.

२) **कायदेशीर नोंदणी (Legal Registration) :** भागीदारी संस्थेची नोंदणी ही सक्तीची नाही. परंतू महाराष्ट्र राज्यामध्ये ती सक्तीची करण्यात आलेली आहे. संबंधित राज्यातील भागीदारी नोंदणी कार्यालयात भागीदारीचा करार नोंदविला जाऊ शकतो, भागीदारी संस्थेची नोंदणी भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार करणे फायदेशीर असते.

३) **भागीदारांची संख्या (Number of Partners) :** भागीदारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान २ व्यक्तिंची व कमाल ५० व्यक्तिंची मर्यादा असते.

४) **कायदेशीर व्यवसाय (Lawful Business) :** भागीदारी संस्थेला कायदेशीर व्यवसाय करावा लागतो. त्याला कायदयाच्या चौकटीतच राहून व्यवसाय करावा लागतो. भागीदारी संस्थेला बेकायदेशीर व्यवसाय करता येत नाही.

५) **व्यवस्थापन (Management) :** भागीदारी करारामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सर्व भागीदार संस्थेच्या व्यवस्थापन कार्यात सहभागी होतात, पण भागीदारी सुरळीत चालावी म्हणून काही भागीदार स्वेच्छेने आपले व्यवस्थापकीय हक्क इतर भागीदाराला देतात. परंतु व्यवस्थापनाची जबाबदारी ही सर्वांवर असते.

६) **भागीदारांमधील परस्पर संबंध (Relationship between the Partners) :** प्रत्येक भागीदार हा भागीदारी संस्थेचा अभिकर्ता त्याच बरोबर प्रधान या नात्याने कार्य करीत असतो. सर्वजण भागीदारी संस्थेचे मालक व अभिकर्ते असतात.

७) **अमर्यादित जबाबदारी (Unlimited Liabilities) :** अल्पवयीन भागीदार सोडून भागीदारी संस्थेमध्ये सर्व भागीदारांची जबाबदारी वैयक्तिक, सामूहिक व अमर्यादित असते .जेंव्हा व्यवसायातील देणी देण्यासाठी व्यवसायाची मालमत्ता अपुरी पडते तेंव्हा बाह्य देयतांची परतफेड करण्यासाठी भागीदारांच्या खाजगी संपत्तीचा उपयोग केला जातो.

८) **संयुक्त मालकी (Joint Ownership) :** भागीदारीमध्ये सर्व भागीदार व्यवसायातील मालमत्तेचे संयुक्त मालक असतात. भागीदारी संस्थेची सर्व मालमत्ता भागीदारी संस्थेत व्यवसायासाठी वापरली जाते. भागीदाराला संस्थेची मालमत्ता खाजगी उपयोगासाठी वापरता येत नाही.

९) **नफा-तोटा विभागणी (Sharing of Profit and Loss) :** भागीदारी करारामध्ये नफा किंवा तोटा कोणत्या प्रमाणात वाटला जाईल हे नमूद केलेले असते. व्यवसाय करून नफा वाटणी करणे हा भागीदारीचा मुख्य हेतू असतो. जर भागीदारी करारामध्ये नफा-तोटा वाटपाचे प्रमाण दिलेले नसेल तर सर्व भागीदार नफा-तोटा समान प्रमाणात वाटून घेतात.

१०) **विसर्जन (Dissolution) :** विसर्जन म्हणजे भागीदारी व्यवसाय बंद करणे होय. एखादया भागीदाराचा मृत्यू, निवृत्ती, दिवाळखोरी, वेड यामुळे भागीदारी संस्था विसर्जित होऊ शकते. ऐच्छिक भागीदारी संस्थेचे विसर्जन कोणत्याही भागीदाराने इतर भागीदारांना किमान १४ दिवसांची पूर्व सूचना देऊन केले जाते. भागीदारी संस्थेचे विसर्जन करणे सोपे असते .



**कृती –**

**२) 'भागीदारीचा करार हा भागीदारीचा पाया असतो' चर्चा करा.**

## २.४ संयुक्त भांडवली संस्था (कंपनी) (Joint Stock Company) :



संयुक्त भांडवली संस्था

इंग्लंड मधील इ.स.१७६० च्या औद्योगिक क्रांती नंतर यंत्राच्या साह्याने मोठया प्रमाणावर मागणीपूर्व उत्पादन होऊ लागले. देशी व विदेशी बाजारपेठांचा विस्तार झाला.

व्यवसायासाठी मोठया प्रमाणावरील भांडवल, व्यवस्थापन कौशल्ये,व्यावसायिक धोका सहन करण्याची क्षमता व्यक्तिगत व भागीदारी व्यवसाय संघटनेत नव्हती. मागणीपूर्व उत्पादन झालेल्या मालाला ग्राहक मिळविण्यासाठी वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रातही क्रांती घडून आल्याने बाजारपेठांचा विस्तार झाला. देशाच्या आर्थिक व्यवस्थेत व्यापार व उत्पादन कार्यक्षमपणे करण्यासाठी संयुक्त भांडवली संस्थेचा उदय झाला.

### २.४.१ अर्थ व व्याख्या (Meaning and Definition ):

- **अर्थ (Meaning) :**

कंपनी कायदा २०१३ प्रमाणे स्थापन झालेली संस्था म्हणजे संयुक्त भांडवली संस्था होय. कंपनीच्या कमाल सभासद संख्येवर मर्यादा नाही. भांडवलाचे विभाजन भागांमध्ये करून संयुक्त भांडवली संस्था प्रचंड प्रमाणावर भांडवल उभारणी करून व्यवसाय करतात.

समान हेतू असलेल्या व्यक्तिंची स्वतंत्र अस्तित्व असलेली संघटना म्हणजे ‘संयुक्त भांडवली संस्था’ (कंपनी ) होय.

- **व्याख्या (Definition) :**

➢ **“कंपनी कायदा २०१३ नुसार स्थापन झालेली व नोंदणी केलेली किंवा अस्तित्वात असलेली कंपनी म्हणजे ‘संयुक्त भांडवली संस्था’ होय.” – कंपनी कायदा २०१३.**

➢ **“स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व, स्वत:ची मुद्रा (बोधचिन्ह) आणि दीर्घ अस्तित्व असणारी कायदयाने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ति म्हणजे ‘कंपनी’ होय”.**

## २.४.२ संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये (Features of Joint Stock Company) :

● संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये

१. ऐच्छिक संघटन
२. सभासद संख्या
३. कृत्रिम व्यक्ति
४. स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व
५. दीर्घकाळ अस्तित्व
६. सक्तीची नोंदणी
७. मर्यादित जबाबदारी
८. बोधचिन्ह
९. तज्ज्ञ व्यवस्थापन
१०. भाग हस्तांतरण करण्याची सोय

१) **ऐच्छिक संघटन (Voluntary Association) :** संयुक्त भांडवली संस्था ही अनेक व्यक्तिंनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना असते . कोणत्याही जात, धर्म, पंथ, वंशाची व्यक्ति कंपनीचे भाग खरेदी करून भागधारक होऊ शकते.

२) **सभासद संख्या (Number of Member) :** कंपनी कायदा २०१३ प्रमाणे खाजगी कंपनी मध्ये किमान सभासद संख्या २ आणि कमाल २०० असते.सार्वजनिक कंपनीमध्ये कायद्याप्रमाणे सभासद संख्या किमान ७ आणि कमाल अमर्यादित असते.

३) **कृत्रिम व्यक्ति (Artificial Person) :** कंपनी ही कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ति असते.तिला व्यक्तिप्रमाणे शरीर, मन, आत्मा नसतो, तरी पण ती व्यक्तिप्रमाणे करार व मालमत्ता धारण करू शकते. कंपनी व्यक्तिप्रमाणे व्यवहार करू शकते, म्हणून तिला कृत्रिम व्यक्ति म्हणतात.

४) **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व (Seperate Legal Status) :** कंपनी कायदा २०१३ नुसार कंपनीची स्थापना झालेली असते,म्हणून तिला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. कंपनी स्वत:च्या नांवाने खरेदी-विक्री करार, कायदेशीर कारवाई करू शकते.इतरांची देणी देण्यासाठी कंपनी स्वत: जबाबदार असते.

५) **दीर्घकाळ अस्तित्व (Continuity of Life) :** कंपनीला कायदेशीर अस्तित्व असल्यामुळे तिला दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व असते. सभासदात बदल, दिवाळखोरी, भागधारकाचा मृत्यू, निवृत्ती याचा परिणाम कंपनीच्या अस्तित्वावर होत नाही. आपल्या सभासदांपासून स्वतंत्र कायदेशीर दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व तिला असते.

६) **सक्तीची नोंदणी (Compulsory Registration) –** कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीप्रमाणे कंपनीची नोंदणी करणे सक्तीचे असते. कायद्याच्या तरतुदीनुसार कंपनीची नोंदणी केल्यामुळे तिला कायद्याचे पाठबळ मिळते.

७) **मर्यादित जबाबदारी (Limited Liability) :** कंपनीच्या भागधारकांची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी किंमती इतकीच मर्यादित असते. कंपनीची कोणतीही देणी देण्यासाठी भागधारकांची खाजगी मालमत्ता धोक्यात येत नाही.

८) **बोधचिन्ह (Common Seal) :** कंपनीला स्वत:ची मुद्रा (बोधचिन्ह) असते. कंपनी कृत्रिम व्यक्ति असल्यामुळे बोधचिन्हाचा वापर ती सहीसारखी करते. सर्व महत्त्वाच्या कागदपत्रावर आणि मालकी हक्काच्या दस्तऐवजावर हे बोधचिन्ह छापलेले असते.

९) **तज्ज्ञ व्यवस्थापन (Professional Management) :** भागधारकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी म्हणजे संचालक मंडळ होय.कंपनीच्या व्यवस्थापनात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पगारी तज्ज्ञ अधिकारी वर्ग नेमला जातो. त्यामुळे कंपनीचे व्यवस्थापन कार्यक्षम होण्यास मदत होते.

१०) **भाग हस्तांतरण करण्याची सोय (Transfer of Shares) :** भागधारकांना कंपनीच्या नियमावलीतील तरतुदीप्रमाणे आपले भाग दुसऱ्या व्यक्तिला मुक्तपणे हस्तांतरण करता येतात. भागधारक भाग बाजारात आपल्या भागांची विक्री करून त्याची रोख रक्कम प्राप्त करू शकतो.



**कृती–**

**३) संयुक्त भांडवली संस्था मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करते चर्चा करा.**

**४) तुमच्या परिसरातील विविध व्यावसायिक संघटना प्रकारातील व्यवसाय संस्थांची यादी तयार करा.**

## २.५ सहकारी संस्थांचा विविध व्यावसायिक संघटनांशी तुलनात्मक अभ्यास:
## (Comparative Study of Various Types of Business Organizations with Co-operative society) :

| अ. क्र. (Sr. No.) | मुद्दे (Point) | व्यक्तिगत व्यापारी संस्था (Sole Trading concern) | भागीदारी संस्था (Partnership Firm) | संयुक्त भांडवली संस्था (Joint Stock Company) | सहकारी संस्था (Co-operative Society) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्थ | एकाच व्यक्तिकडे व्यवसायाची मालकी, व्यवस्थापन व नियंत्रण असते, त्यास व्यक्तिगत व्यापारी संस्था असे म्हणतात. | दोन किंवा अधिक व्यक्ति एकत्र येऊन नफा प्राप्तीच्या हेतूने कोणताही कायदेशीर व्यवसाय सामूहिकरीत्या करतात त्याला भागीदारी संस्था असे म्हणतात. | ज्या संस्थेला दीर्घ काळ टिकणारे अस्तित्व असून प्रतीक म्हणून तिचे एक बोधचिन्ह असते आणि सरकार दप्तरी कायद्यानुसार नोंदणी झालेली असते तिला संयुक्त भांडवली संस्था असे म्हणतात. | स्वत:च्या आर्थिक प्रगतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या तत्वावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंनी स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय. |
| २ | उद्देश | व्यक्तिगत व्यापारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | भागीदारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | संयुक्त भांडवली संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. | सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा नसून आपल्या सभासदांना सेवा प्रदान करणे हा असतो. |
| ३ | सभासद संख्या | व्यक्तिगत व्यापारामध्ये किमान आणि कमाल एकच व्यक्ति सभासद असते. | भागीदारी संस्थेत किमान दोन आणि कमाल पन्नास भागीदार असतात. | खाजगी कंपनीत किमान दोन आणि कमाल दोनशे तर सार्वजनिक कंपनीत किमान सात व कमाल अमर्यादित सभासद असतात. | सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान दहा व कमाल अमर्यादित सभासद असतात. |
| ४ | नोंदणी कायदा | व्यक्तिगत व्यापारासाठी कोणताही स्वतंत्र कायदा नाही. | भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार भागीदारी संस्थेची नोंदणी केली जाते. | कंपनी कायदा २०१३ नुसार संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी केली जाते. | महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्थेची नोंदणी केली जाते. |
| ५ | जबाबदारी | व्यक्तिगत व्यापारी संस्थेत व्यापाऱ्याची जबाबदारी अमर्यादित असते. | भागीदारी संस्थेमध्ये भागीदारांची जबाबदारी वैयक्तिक, सामूहिक व अमर्यादित असते. | संयुक्त भांडवली संस्थेमध्ये भागधारकांची जबाबदारी मर्यादित असते. | सहकारी संस्थेमध्ये सभासदांची जबाबदारी मर्यादित असते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | **व्यवस्थापन** | एकच व्यक्ति व्यवसायाचे दैनंदिन व्यवस्थापन करते. | सर्व भागीदारांना दैनंदिन व्यवस्थापनात समान अधिकार असतात. सर्व भागीदार सामूहिक व्यवस्थापन करतात. | संयुक्त भांडवली संस्थेचे व्यवस्थापन संचालक मंडळ पाहते. | सहकारी संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन कार्यकारी समिती पाहते. |
| ७ | **भांडवल** | एकच व्यक्ति व्यवसायाला भांडवल पुरवठा करते. त्यामुळे अतिशय कमी भांडवल जमा होते. | भागीदारी संस्थेत अनेक भागीदार असल्याने भांडवलात वाढ होते. | सभासद संख्या मोठी असल्यामुळे मोठया प्रमाणात भांडवल जमा होते. | आर्थिक दुर्बल घटकातील सभासद असल्याने भांडवलात फारशी वाढ होत नाही. |
| ८ | **स्थापना** | ज्यावेळी व्यक्तिच्या मनात येईल त्यावेळी या व्यवसायाची स्थापना करता येते. | भागीदार एकमेंकामध्ये करार करून भागीदारी संस्थेची स्थापना करतात. | संयुक्त भांडवली संस्थेची स्थापना प्रवर्तकाद्वारे केली जाते. या संस्थेची स्थापना खर्चीक व गुंतागुंतीची असते. | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांनी सामूहिक हितासाठी सहकारी संस्थेची स्थापना केलेली असते. या संस्थेची स्थापना सहज व सुलभ असते. |
| ९ | **व्यवसाय गुप्तता** | व्यक्तिगत व्यवसायामध्ये एकच व्यक्ति मालक असल्यामुळे जास्तीत जास्त व्यवसायात गुप्तता पाळतो. | भागीदारी संस्थेमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ति मालक असल्यामुळे व्यावसायिक गुप्तता पाळणे शक्य नसते. | संयुक्त भांडवली संस्थेला व्यवसायाचे वार्षिक जमाखर्च प्रसिद्ध करावे लागतात त्यामुळे गुप्तता पाळता येत नाही. | सहकारी संस्थेला वार्षिक हिशेब पत्रके प्रसिद्ध करावी लागत असल्यामुळे गुप्तता पाळता येत नाही. |
| १० | **नफा–तोटा वाटप** | व्यक्तिगत व्यवसायात मिळणारा नफा किंवा तोटा एकाच व्यक्तिचा असतो. | भागीदारी व्यवसायात मिळणारा नफा–तोटा सर्व भागीदारांना करारात नमूद केल्याप्रमाणे वाटप केला जातो. | संयुक्त भांडवली संस्थेमध्ये संचालक मंडळ वार्षिक सभेत ठराव मंजूर करून लाभांश रुपाने नफा वाटप करते. | सहकारी संस्थेच्या नफ्याचा वापर प्रथम राखीव निधीसाठी व विकासासाठी करून सभासदांना न्याय्य पद्धतीने नफ्याचे वाटप केले जाते. |
| ११ | **विसर्जन** | व्यक्तिगत व्यवसायात मालकाचा मृत्यू, दिवाळखोरी, वेडेपणामुळे व्यक्तिगत व्यवसायाचे विसर्जन होते. | भागीदाराचा मृत्यू, निवृत्ती, करारातील तरतुदीमुळे भागीदारी संस्थेचे विसर्जन होते. | कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार आणि न्यायालयाच्या अनुमतीने संयुक्त भांडवली संस्थेचे विसर्जन होते. | निबंधकाच्या निर्णयानुसार सहकारी कायद्याप्रमाणे सहकारी संस्थेचे विसर्जन होते. |

## २.६ सारांश

- **मानवी गरजा भागविणारे अनेक व्यवसाय समाजात अस्तित्वात आहेत. नफा प्राप्तीच्या हेतूने केलेल्या कोणत्याही कार्याला 'व्यवसाय' असे म्हणतात.**
- **समाजात चांगली उद्‌दिष्ट्ये किंवा हेतू साध्य करण्यासाठी एकत्र आलेला मानवी समूह म्हणजे 'संघटन' होय.**

- **व्यवसाय संघटनांचे प्रकार :–**

  १) व्यक्तिगत व्यापारी संस्था
  २) भागीदारी संस्था
  ३) संयुक्त भांडवली संस्था
  ४) सहकारी संस्था

- **व्यक्तिगत व्यापारी संस्था :–**एकाच व्यक्तिच्या भांडवलावर, नियंत्रण व व्यवस्थापन कौशल्यावर जो व्यवसाय चालविला जातो त्यास व्यक्तिगत व्यापारी संस्था असे म्हणतात.

❖ **व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये :–**

१) सुलभ स्थापना
२) व्यवसायाची मालकी
३) स्वत:चे भांडवल
४) व्यवस्थापन
५) अमर्यादित जबाबदारी
६) व्यवसायातील गुप्तता
७) नफा–तोट्यात भागीदार नसतो.
८) ग्राहकाशी सलोख्याचे संबंध
९) त्वरीत निर्णय
१०) स्वयंरोजगाराचा मार्ग

- **भागीदारी संस्था:–**सर्वांतर्फे एक किंवा अधिक व्यक्तिंनी चालविलेल्या व्यवसायातील नफ्याचे वाटप करण्यासाठी आपापसातील कराराने दोन किंवा अधिक व्यक्तिंनी एकत्र येऊन निर्माण केलेला संबंध म्हणजे भागीदारी संस्था होय.

❖ **भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये:–**

१) करार
२) कायदेशीर नोंदणी
३) भागीदारांची संख्या
४) कायदेशीर व्यवसाय
५) व्यवस्थापन
६) भागीदारांमधील परस्पर संबंध
७) अमर्यादित जबाबदारी
८) संयुक्त मालकी
९) नफा–तोटा विभागणी
१०) विसर्जन

- **संयुक्त भांडवली संस्था :–** ज्या संस्थेला दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व असून प्रतीक म्हणून ज्या संस्थेचे एक बोधचिन्ह असते व जिची निर्मिती कंपनी कायदा २०१३ च्या कायद्यानुसार सरकार दप्तरी नोंदणी झालेली असते अशी संस्था म्हणजे संयुक्त भांडवली संस्था होय.

❖ **संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये :–**

१) ऐच्छिक संघटन
२) सभासद संख्या
३) कृत्रिम व्यक्ति
४) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व
५) दीर्घकाळ अस्तित्व
६) सक्तीची नोंदणी
७) मर्यादित जबाबदारी
८) बोधचिन्ह
९) तज्ज्ञ व्यवस्थापन
१०) भाग हस्तांतर करण्याची सोय

## २.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **व्यवसाय :–** वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करण्याच्या आर्थिक क्रियेला व्यवसाय असे म्हणतात.

२) **व्यवसाय संघटन :–** एखाद्या व्यवसायाची रचना किंवा बांधणी की,जी कार्यक्षमपणे नफा मिळविण्यासाठी व्यापारी क्रिया किंवा उपक्रम करून वस्तूंचे उत्पादन आणि पुरवठ्यांच्या माध्यमातून फायदा मिळविण्याचा प्रयत्न करील.

३) **भागीदारीचा करार :–** भागीदारी व्यवसायाचे अंतर्गत व्यवस्थापनाचे अटी व नियम.

४) **मर्यादित जबाबदारी :–** सभासदांची जबाबदारी त्याने खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी मूल्याइतकी मर्यादित असते. मर्यादित जबाबदारीमध्ये सभासदांची खाजगी मालमत्ता धोक्यात येत नाही.

५) **अमर्यादित जबाबदारी :–** संस्थेच्या कर्जाची व इतर देणी देण्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या मालकाची असते. या प्रकारच्या जबाबदारीत सभासदांची खाजगी मालमत्ता धोक्यात येऊ शकते, प्रसंगी खाजगी मालमत्ता विकून देणी द्यावी लागतात.

## २.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) व्यक्तिगत व्यापारात एकच व्यक्ति व्यवसायाची ----- असते.
अ) सावकार    ब) मालक    क) दलाल

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत ----- व्यावसायिक गुप्तता पाळली जाते.
अ) कमीत कमी    ब) जास्तीत जास्त    क) कमी-जास्त

३) व्यक्तिगत व्यापाऱ्याची जबाबदारी ----- असते.
अ) मर्यादित    ब) सामूहिक    क) अमर्यादित

४) भागीदारी व्यवसायात कमाल ----- भागीदार असतात.
अ) वीस    ब) दहा    क) पन्नास

५) महाराष्ट्र राज्यामध्ये भागीदारी संस्थेची नोंदणी ----- आहे.
अ) ऐच्छिक    ब) सक्तीची    क) अनावश्यक

६). भारतीय भागीदारी संस्था कायदा ----- साली संमत झाला.
अ) १९३२    ब) २०१३    क) १९६०

७) भागधारकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला ----- म्हणतात.
अ) संचालक    ब) सभासद    क) मालक

८) कंपनी कायदा ----- साली संमत झाला.
अ) १९३२    ब) २०१३    क) १९६०

९) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी ----- असते.
अ) सक्तीची    ब) ऐच्छिक    क)अनावश्यक

१०) सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान ----- सभासदांची आवश्यकता असते.
अ) दोन    ब) दहा    क) सात

## ब) योग्य जोड्या जुळवा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) व्यक्तिगत व्यापारी संस्था | १) १९६० |
| ब) भागीदारी संस्थेची किमान सभासद संख्या | २) कमीत कमी व्यावसायिक गुप्तता |
| क) संयुक्त भांडवली संस्था कायदा | ३) १९५१ |
| ड) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा | ४) इंग्लंड |
| इ) औद्योगिक क्रांती | ५) १९२५ |
| | ६) २०१३ |
| | ७) भारत |
| | ८) दोन |
| | ९) जास्तीत जास्त व्यावसायिक गुप्तता |
| | १०) दहा |

**क) खालील विधानांसाठी एकशब्द/शब्दसमूह लिहा.**

१) एकपात्री प्रयोगासारखा व्यवसाय संघटन प्रकार.

२) सन २०१३ च्या कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ति.

३) स्वयंरोजगारांसाठी लोकप्रिय व्यवसाय संघटन प्रकार.

४) आपल्या सभासदांना सेवा प्रदान करण्यासाठी स्थापन केलेला व्यवसाय संघटन प्रकार.

५) भागीदारांनी अंतर्गत व्यवस्थापनासाठी परस्परांमध्ये केलेल्या अटी व नियम.

**ड) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची नोंदणी आवश्यक असते.

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत त्वरीत निर्णय घेतले जातात.

३) भागीदारी संस्थेचा करार लेखी किंवा तोंडी असू शकतो.

४) सहकारी संस्थेचा मुख्य हेतू जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो.

५) कंपनीची भांडवल उभारणी क्षमता प्रचंड नसते.

६). औदयोगिक क्रांती नंतर कंपनी संघटन प्रकार उदयास आला.

७) संयुक्त भांडवली संस्थेला अल्पकाळ टिकणारे अस्तित्व असते.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) व्यक्तिगत व्यापाऱ्याची जबाबदारी ............. असते.

२) भागधारकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीला .......... म्हणतात.

३) सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान ........ सभासदांची आवश्यकता असते.

४) भागीदारी संस्था कायदा ........... साली संमत झाला.

५) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी ......... असते.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) व्यक्तिगत व्यापारी संस्था | |
| २) | कायदा १९३२ |
| ३) औद्योगिक क्रांती | |
| ४) | बोधचिन्ह |
| ५) किमान सभासद दहा | |

सहकारी संस्था, कंपनी, १९५६, भारत, एकच व्यक्ती, भागीदारी संस्था, इंग्लंड

## ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) एकल व्यापारी म्हणजे काय?

२) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी कोणत्या कायद्याप्रमाणे केली जाते?

३) भागीदारी संस्थेमध्ये कोणत्या भागीदाराची जबाबदारी मर्यादित असते?

४) भागीदारीचा करार म्हणजे काय?

५) स्वयंरोजगारासाठी कोणता व्यावसायिक संघटन प्रकार लोकप्रिय आहे?

६) मर्यादित जबाबदारी म्हणजे काय?

## ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरूस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेमध्ये किमान व्यावसायिक गुप्तता राखली जाते.

२) भागीदारी संस्थेची नोंदणी भारतीय भागीदारी कायदा १९५६ नुसार केली जाते.

३) कंपनी कायदा २०१३ प्रमाणे कंपनीमध्ये कमाल सभासद संख्या मर्यादित असते.

४) सहकारी संस्थेची नोंदणी १९३२ च्या कायद्यानुसार केली जाते.

## ई) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) अ) व्यक्तिगत व्यापारी संस्था  ब) भागीदारी संस्था
   क) सहकारी संस्था  ड) संयुक्त भांडवली संस्था

२) अ) १९३२ चा कायदा  ब) १९६० चा कायदा
   क) २०१३ चा कायदा  ड) १९५० चा कायदा

## ज) योग्य क्रम लावा.

१) अ) कंपनी कायदा  ब) महाराष्ट्र सहकार कायदा
   क) भागीदारी संस्था कायदा

## प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१) व्यवसाय.

२) व्यक्तिगत व्यापारी.

३) भागीदारी संस्था.

४) भागीदारीचा करार.

५) संयुक्त भांडवली संस्था.

## प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.

१) व्यवसाय संघटन प्रकारातील कोणता व्यवसाय संघटन प्रकार आपण व्यवसायासाठी निवडाल याबाबत आपले मत व्यक्त करा.

२) “भागीदारीचा करार हा भागीदारी संस्थेचा पाया असतो”आपले मत व्यक्त करा.

३) “स्वयंरोजगारासाठी व्यक्तिगत व्यवसाय संघटन प्रकार सर्वात उत्तम आहे”याबाबत आपले मत व्यक्त करा.

### प्र.४ फरक स्पष्ट करा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्था आणि सहकारी संस्था.

२) भागीदारी संस्था आणि सहकारी संस्था.

३) संयुक्त भांडवली संस्था आणि सहकारी संस्था.

### प्र.५ टीपा लिहा.

१) व्यवसाय संघटनांचे प्रकार.

२) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये.

३) भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये.

४) संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये.

### प्र.६ कारणे द्या.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेत त्वरीत निर्णय घेतले जातात.

२) संयुक्त भांडवली संस्थेची भांडवल उभारणी क्षमता प्रचंड असते.

३) भागीदारीचा करार लेखी असला पाहिजे.

४) संयुक्त भांडवली संस्थेमध्ये भागांचे हस्तांतरण मुक्तपणे करता येते.

५) व्यक्तिगत व्यापारी संस्था संघटन प्रकार स्वयंरोजगारासाठी लोकप्रिय असतो.

### प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) व्यवसाय संघटनेचे प्रकार स्पष्ट करा.

### प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न

१) व्यक्तिगत व्यापारी संस्थेची व्याख्या सांगून, व्यक्तिगत व्यापारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) भागीदारी संस्थेची व्याख्या सांगून,भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) संयुक्त भांडवली संस्थेची व्याख्या सांगून,संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

◆◆◆